MHRT080001782024

## नियमित दिवाणी दावा क्रमांक १९/२०२४ मधील निशाणी क्र. ४५ खालील आदेश

१. वादीनी सदरचा दावा प्रतिवादीने घर नंबर २०० अ चे बांधकाम वादीस योग्य तो हिस्सा दिल्याखेरीज करू नये, अशा निरंतरच्या ताकीदीकरीता व बांधकाम पूर्ण केल्यास त्यातील १/३ हिस्सा वादीला वाटप करून मिळावा याकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्याच्या विरूध्द झालेला दि. २०/०६/२०२४ रोजीचा "कैफियत नाहीचा" आदेश रद्द करण्यात यावा याकरीता केलेला आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १ याचा वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र. १ च्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, मागील काही तारखांना कागदपत्रे आणि माहितीच्या अभावी प्रतिवादी क्र. १ ला वेळेत कैफियत देता आली नाही. दरम्यानच्या काळात त्याच्या विरूध्द विनाकैफियत आदेश झाला. तरी प्रतिवादी क्र. १ विरुध्द झालेला कैफियत नाहीचा आदेश रद्द करण्यात येवून प्रतिवादीला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी, अशी विनंती प्रतिवादीच्या वकीलांनी केली.

३. वादीच्या वकीलांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले. वादीच्या वकीलांनी असे कथन केले आहे की, अर्ज खोटा व खोडसाह असून विलंबाचे कोणतेही सविस्तर कारण अर्जात नमुद नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अर्ज पाहिला. अर्जातील कथने पाहिली. अभिलेखाचे निदर्शन केले असता दिसून येते की, दि. २०/०४/२०२४ रोजी प्रतिवादी क्र. १ विरूध्द विनाकैफियत आदेश पारीत झालेला आहे. मात्र वाटपाच्या दाव्यामध्ये पक्षकाराचे म्हणणे विचारात न घेता दावा चालविणे नैसर्गिक न्यायतत्वाला अनुसरून नाही. निश्चीतच प्रतिवादी क्र.१ ने विहीत कालावधीमध्ये कैफियत दाखल न केल्याने विनाकैफियतीचा आदेश पारीत झाला. मात्र त्यामागे असलेली कारणे विचारात घेता प्रतिवादीला आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायोचीत आहे. सबब पुढील आदेश परीत करण्यात येतो -

## आदेश

१. अर्ज नि. ४५ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी वादीना आजच्या अथवा पुढील तारखेस रक्कम रुपये ५००/- देणेच्या अटीवर प्रतिवादी क्र.१ विरुध्द झालेला विनाकैफियतचा आदेश रद्द करणेत येतो.

३. प्रतिवादी क्र. १ यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर कैफियत त्वरीत दाखल करावी व दाखल केलेली असल्यास ती वाचून दाखल करावी.

सही/-

**(श्रुती ह. पाटील)**

**दि. २०/०९/२०२४**

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**

# CERTIFICATE

order in R.C.S. No.19/2024 Exh.45

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | T. N. Khade (Jr. Clerk) |
| Court name | : | Jt. Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 20/09/2024 |
| Order signed by the presiding officer on | : | 20/09/2024 |
| Order uploaded on | : | 20/09/2024 |